# प्रभु तरुण

| वर्ष ५६ | अंक ०९ | मुंबई | १६ मे, २०२३ | पाने ६ | किंमत रु. १ |
|---|---|---|---|---|---|

( *स्थापना :* तारीख २५ ऑगस्ट १९२३ )

**तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?**

**www.prabhutarun.org**

*संपादिका:* **सुहासिनी कीर्तिकर**  *कार्यकारी संपादक मंडळ :* **मिनाक्षी जयकर, मयुरा नायक, संजना कोठारे, वैजयंती कीर्तिकर**

*संपादकीय*

## स्वस्तिरस्तु!

—**सुहासिनी कीर्तिकर**

सध्या आपण बदलांच्या सांध्यावर उभे आहोत की काय? एक काळ असा होता की बदल व्हायचे; पण सहज प्रक्रिया म्हणून. जसजसा काळ पुढे सरकतो तशी बालिका किशोरी होते. काळ आणखी पुढे सरकला की काळाचे बोट धरून ती सहज नवयुवती होते. हे सहज घडणे इतके बेमालूम सांधा बदलण्याइतके गतिमान; तरीही संथ आणि नैसर्गिकपणे व्हायचे. आणखी काळ पुढे सरकला की युवती पुरंध्री व्हायची, वृद्धा व्हायची. त्यात कृत्रिम काहीच नसायचे. आता? आता बदल झपाट्याने होताहेत. केले जाताहेत. जगण्याचे कुठलेही क्षेत्र पहा. फार विषण्ण होऊन एक वाक्य मनी येतं, ''आमच्या वेळी हे असं नव्हतं बाई!'' यात रडका सूर नाही. तक्रारखोरीही नाही वा टीकोजीरावी वृत्तीही नाही. अगतिकता तर नाहीच नाही. आहे ते बदलांचे साक्षीत्व.

बाला-पुरंध्री या अवस्थांचा दाखला दिलाच आहे तर; तेच उदाहरण पुढे बोट धरून नेता येईल की. पूर्वी नऊवारीत नार होती. बालगंधर्वांचे अनुकरण म्हणून पदराचा शेव उजव्या खांद्यावर छान त्रिकोण मिरवायचा. माना वेळावून बोलले जायचे. ''आम्ही नाही बाई'', ''आम्हाला लाज वाटते बाई'' असे लाडिक व्यक्त होत पायाच्या अंगठ्याने जमीन चाचपली जायची. मानेचे मुरके, झटके, भरघोस अंबाडा हातांनी चाचपत 'पोझ' देणे आदींमध्ये स्त्रीत्व फुलवले जाई. पुढे जागतिक महायुद्धाची झळ लागली. बाई पोस्टात, रेशनिंग खात्यात नोकरी करू लागली. फाळणीमुळे सिंधी महिलांना जवळून पाहिले गेले. मग सोयीसाठी नऊवारीचे पाचवारी हे बंड ठरले. त्याकाळच्या 'विविधवृत्त' सारख्या वर्तमानपत्रात आज मजेशीर वाटणारे वाद खेळवले जाऊ लागले. 'स्त्रियांनी पाचवारी (बिन काष्टयाचे) नेसावे का?'', 'स्त्रियांनी नोकरी करावी का?' इत्यादी. मग पाचवारीला साजेसा अंबाडा जाऊन एक लांबसडक शेपटा आला. खाकोटीला पर्स आली. 'वेणीफणी' जाऊन 'उर्दू लिपी' (हा विंदांचा शब्द!) असणाऱ्या कपाळी केसांच्या बटा आल्या. पायात चपला जाऊन सँडल आले. (माहित्येय का? स्त्रियांनी बाहेर पडताना पायात वहाण घालावी यासाठी गोपाळ गणेश आगरकरांनी चळवळ उभारली होती एकेकाळी.) मग वेगाने बरेच बदल तिच्यात झाले. तिचे शिक्षण, तिची आर्थिक कमाई, अवतीभवतीचे वातावरण यांचा परिणाम अटळपणे होत घराबाहेरही मिश्र संस्कृतीचा ती घटक झाली. लांब बाह्या, फुग्याच्या बाह्या करीत बिनबाह्यांचे पोलके आले. (पोलके हा आज कसा वाटतो ना शब्द? आता 'पोलका' म्हणजे गोल वाटाणे असलेला कपडाच माहीत असतो आपल्याला.) मग काळ पुढे सरकला.... पाचवारी कशाला गर्दीत नेसायचे?.. म्हणून स्कर्ट-ब्लाऊज आला. पण तोही कसा? गळाबंद ब्लाऊज आणि पायाच्या घोट्याच्या दोन बोटे वर स्कर्ट! हळुहळू या स्कर्टची उंची पोटरीपर्यंत, घोटाळ्याजवळ; मग गुडघ्याखाली, मग गुडघ्याच्या वर किंचित अशी आटत गेली. मला आठवतेय- माझ्या शाळेतले मराठीचे सर निबंधाचा शेवट कसा असावा; ते सांगताना गंमतीने म्हणायचे, 'मुलीचा स्कर्ट किती तोकडा असावा म्हणजे आकर्षक होतो आणि किती लांब असावा म्हणजे सुसंस्कृत होतो ते ज्याचे त्याने ठरवायचे. निबंधही तसाच असावा. सौंदर्यवर्धक.'' काळ पुढे सरकला... स्कर्ट गेले. फ्रॉक्स (झगे) आले, मग शर्ट शॉर्टस् आल्या. शर्टही गेले आणि झाकायचे तेवढेच झाकणारे पोशाख आले. अंबाडा, वेणी, फुले माळणे, बांगड्या-मंगळसूत्र घालणे इ. गडप झाले. बॉयकटस् आले. पुरुषी किंवा कणखर रूप दाखविणाऱ्या लकबी आल्या. पोशाख लोपला, वेअर्स आले. भाषा बदलली. शरीरसौष्ठव राखण्यासाठी खाणे 'पिणे' बदलले. स्त्री ही स्वयंपाक करणारी, वर्षाचे धान्यधुन्य साठवणारी, पापड-लोणची करणारी, बांगड्यांची किणकिण करत घरकामात दंग असणारी अशी आता नाही दिसत. तिच्या करमणुकीच्या कल्पना बदलल्या. काही अंतराने 'आऊटिंग' अटळ ठरू लागले. आजची स्त्री वेगाशी चपळाईने शर्यत लावते, जिंकते. शिक्षण-नोकरीचे क्षेत्र यात ती सर्वांत पुढे आहे. वेगळ्या इंग्रजी मालिकात रमणारी ही आजची स्त्री खऱ्या अर्थाने स्वयंसिद्धा आहे. आपल्या अंगच्या गुणांनी ते तिने सिद्ध केलेले आहे.

पण सिद्ध होता होता या बदलांमुळे ती विद्धही होत आहे. घरपण तिला मिळतेच असे नाही. जीवनसख्याशी सख्य असतेच असे नाही. स्वत:चे स्वतंत्र मत आणि विचार असल्याने इतरांशी जुळवून घेण्याचे तंत्र साधतेच असे नाही. तिला कर्तृत्वामुळे प्रसिद्धी मिळत असली तरी आनंदाची निखळ सिद्धी तिला साधतेच असे नाही.

पूर्ण जगाशी संपर्कात असूनही ती मनाने या जगात असतेच असेही नाही. ती अनेकांत पसरून विस्तीर्ण अवकाश कवेत घेत असली तरी मनाच्या अवकाशात ती एकाकी असते. 'बहुस्याम्' ही तिची नवनिर्मितीची शरीरक्षमता धुडकावताना ती आज 'बहुला' नाही. म्हणजे एकेकाळची बाहुली कळसूत्र भिरकावत कर्तृत्वाने वावरण्याच्या पद्धतीत 'स्व'रूप झाली; तरी ती त्यातूनच अरूप स्थितीत आली. स्वान:तसुखाय म्हणता म्हणता 'सुख म्हणजे नेमकं काय असतं' हेच हरवत चालली.

मित्रहो, बदलांचा मागोवा घेता स्त्रीचं मी फक्त उदाहरण घेतलं. या 'फक्त' शब्दात मेख आहे! कारण.... कारण अलिकडच्या आपल्या ज्ञातीतील काही बातम्या या बदलांकडे बोट दाखविणाऱ्या आहेत. मला माहीत आहे की काहीजण म्हणतील, 'हे अटळ आहे.' पण.... पण काही बाबी टाळणेही शक्य आहे ना? अशक्य ते शक्य करता येते जर आपण समंजस माणसं असू तर! बदल होतोय हे मान्यच. पण पायांखालची जमीन सरकेल इतके नको ना स्वतंत्र आकाशात झेपावयाला. हो ना?

'हो ना?' हे मी कुणाला म्हणणार? कारण मला पूर्ण खात्री आहे की आपल्या ज्ञातीतील मी फक्त 'काही' बातम्या म्हटलेय. कारण आपली ज्ञात जन्मत:च सुसंस्कृत आहे; अन् ही संस्कृती जागतिक बदलांच्या पाटीवर आजही आपला श्रीगणेशा गिरवीत आहे. खाडिलकरांच्या नाटकातील नायिका जसे म्हणते ना; 'नृपकन्या तव जाया। सुखविलासी सोडीना विनया' तशी परभीण आजच्या बदलत्या काळातही आपली संस्कृती जराही सोडत नाही. 'सुख म्हणजे नक्की काय असतं? जे घरबसल्या मिळतं?' असे प्रश्न तिला पडतच नाहीत. पडणारही नाहीत. जग बदलांच्या पट्ट्यांवर वेगाने पुढे सरकत असलं तरीदेखील परभांच्या घरात सगळे रीतिरिवाज पाळले जातात. सणवार साजरे होतात. पति पत्नी, सासू सुना, गुण्या गोविंदाने नांदतात. मी वर नोंदवलेले बदल चिंतेचे 'बादल' असले तरी हे ढग विरूनच जाणारे आहेत. समंजस-पणाचे वारे वाहत आहेतच. म्हणूनच ना; आपण आनंदाने कुणाच्या लग्नाचा माणिकमहोत्सव, कुणाच्या लग्नाचा सुवर्णमहोत्सव साजरा करतो. सौख्यभरे नांदण्याची ती जीवंत, प्रत्यक्ष खूण आहे ना? अशी खूण पटली की 'स्वस्तिरस्तु।' हा आपोआपच आशीर्वाद मुखातून प्रगट होतो. तर मंडळी, पाठारे प्रभूंच्या सर्व नांदत्या घरांत हे मनातले आशीर्वचन प्रत्यक्षात अनुभवास येतेय : ते अखंड येत राहो.

# PREDICTION OF DEATH

-Vinay Trilokekar

Can anyone predict his or her own death? You never know what's in store for you.

A friend or you may say an acquaintant of mine , who has just crossed his fifty, said ,.

"Only if I can know in advance when I am going to die, I can plan everything, make my financial decisions in better way, knowing how much time I have on my hand, I can spent quality time with my family. Take my wife to the places where I had promised her to take, but couldn't because of work load and business obligations and other commitments. Settle loans that I have taken and simply enjoy the remaining time that I am left with.. Thank everyone who has helped me and apologize to those whom I may have offended."

This is nothing but wishful thinking, isn't it? Uncertainty of life, is the essence and beauty of our life.

Once a doctor- surgeon said, "About 9 out 10 serious patients we as their doctors, say for sure, that these are simply 'hopeless cases' and there is no chance of their survival. Yet we genuinely work hard on the patient, praying and hoping that we are proved wrong and the patient gets we'll inspite of our expert opinions. When such a patient goes home, we do feel good and are very happy , but don't consider us as God's, we are but mortals! "

No one can tell, may he be a doctor, an astrologer or a sorcerer, no one can predict when and where you will get your death, that's the truth!

Once a specialist was treating an elderly person. During his all the visits to the hospital for treatment, his son always accompanied him. His illness was of very serious nature and the doctor had given him less than year to live. However, years after years went by. He continued to live and so did his treatment. And the son too kept his routine.

Then one day the old man had come all alone.

"Mr. Joshi, you have come alone, the doctor asked, " Avinash isn't accompanying you today?"

"Last Sunday Avinash collapsed and died. He had a massive heart attack. My robust and healthy son, just in his thirties goes away and this old man just carries on and on. What do you call it?"

Dr. Altaf Patel, Director medicine Jaslok Hospital, Medical editor columnist Mumbai Mirror, Retd. Prof Med Grant Med College and JJ Hospital, had once written in his Mumbai Mirror column (I had been his ardent follower and would read all his write-ups)

[ In verbatim]

I remember when my father was ill in his last year of life. There were multiple hospitalisations, and he rallied around to come home each time well. At some point of time it dawned on me that he was nearing his death. I confided in my friend, who is an astrologer. I explained to him that I was at the height of my career and had several academic conferences and commitments and a large practice to deal with, and every time I travelled I feared he would be dead. My astrologer friend provided me a date of death, which I shared with my siblings well in advance. They did take it as strange that a man of science would bother about astrology. I explained that I had not asked but the astrologer was forthcoming in helping me and I did not want to dishearten him.

The date was given of a year hence. My father was actually discharged two days in advance of this date, but I insisted he stay on. It is strange, I thought, how these suggestions without scientific fact could even affect a man of science such as me. On the appointed date, nothing happened till the evening so I left on some urgent property matters that I had to sort out - to learn that he died the next day. So with the most talented doctors declaring him fit to go home, the astrologer was not completely off the mark. He had been uncannily correct on several past occasions on various subjects. He used to argue with me that astrology though a science is not a complete science like medicine; I am inclined to believe that this is correct.

Some what similar to this was my experience.

A renowned astrologer, Mr Sharmaji stayed in Gol building next to ours (actually it is not its name, but so called because of its round shape). Aai (mother) knew him. A huge hoarding (advertising his skills- how he could solve your problems - cracking exams, solving monetary problems, matrimonial consultation and what not.)

She would often tell me that Sharmaji asked her to come with her son (meaning me). But everytime I managed to avoid by promising to go with her the next day. But tomorrow never comes!

‘‘नमस्ते अलकाबहेन, आप लडकेको लेकर आये नही?यही है वह? क्यो बेटे कैसे हो?

‘‘हम कल आयेंगे।’’ आईने सांगितले.

‘‘मेरे पास वक्त की कमी है, आज शाम पांच बजेतकही मेरेपास समय है. कल मै नही हूँ।’’

Next day a notice board was put at the gate of Gol building. It read - Sharmaji had died the previous evening exactly at 5 pm

. Did he actually know when he would die?

Death is inevitable and that's the truth. Everyone has to face it. Only could be someone very close and dear to you or your own deteriorating condition, you find it difficult to face the situation. This is the second truth.

Fortunately, such thoughts come to most of us when we have reached old age but unfortunately for a few, they are compelled to have such thoughts at very early age.

Holly Butcher from Australia, was the one among such unfortunate person!

She must have hardly reached 24 or 25 and made to think about death. She was suffering from dangerous and incurable malignant cancer, Ewing's sarcoma.

On 3 January, 2018, when she was at the door steps of death, she wrote this letter ( which had become viral in the social media and gained immediate attention).

(Her last letter in verbatim)

“It’s a strange thing to realise and accept your mortality at 26 years young. It’s just one of those things you ignore. The days tick by and you just expect they will keep on coming; Until the unexpected happens. I always imagined myself growing old, wrinkled and grey- most likely caused by the beautiful family (lots of kiddies) I planned on building with the love of my life. I want that so bad it hurts.”

After posting this touching letter hardly 24 hours had lapsed when she passed away. Holly Butcher died on 4 January 2018,

Mobile no. 7506376746
email : vbt1946@yahoo.co.in

आठवणींच्या साठवणीतून

# कढीलिंब आणि तुळस

-डॉ. सुमन नवलकर

शेजाऱ्यांकडून कढीलिंबाचं रोप आणून आम्ही आमच्याकडच्या मोठाल्या कुंडीत लावलं. खूप छान बहरलं ते. फोफावलं म्हणणंच अधिक योग्य होईल. फोडणीत न टाकताही त्याच्या पानांचा सुगंध आसमंतात कसा दरवळला कोण जाणे. दरम्यान शेजाऱ्यांकडचा कढीलिंबही सुकून गेला. मग ते तर यायचेच, पण आमचे दुसरे शेजारी, वरच्या-खालच्या मजल्यांवरचे चुलत-मावस-आते-मामे शेजारीही सकाळी ऐन घाईच्यावेळी कढीलिंबाची पानं मागायला यायचे. आम्हाला आमच्या स्वैंपाकासाठी कढीलिंबाची पानं ओरबाडायला जीवावर यायचं. पण अडल्या-नडल्या-पिडलेल्यांना द्यायचो आपले भरल्या अंत:करणाने पानं तोडून. काही शेजारी तर असे धीट की दार उघडलं की सरळ आम्हाला ओलांडून गॅलरीतच जाणार थेट. हवी तेवढी, हवी ती पानं तोडून घेणार आणि घाई-घाईत निघून जाणार. 'Love thy neighbour as thyself,' ही उक्ती कोळून प्यायल्यासारखेच.

हळू-हळू आमचा कढीलिंब खचत गेला. ‘कढीलिंब बोलेना- कढीलिंब चालेना- कढीलिंब खंत करी काही केल्या फुलेना’ अशी गत झाली त्याची. मग त्याने आपली कवाडं आतल्या आत बंद करून घेतली. जणू बंदिस्तच करून घेतलं स्वत:ला. दिवस गेले- महिने गेले- कदाचित वर्षंही गेली असतील. रोज इतर झाडांबरोबर त्यालाही पाणी घातलं जायचं. पण हे आपलं जसंच्या तसं. एक अंकुर नाही, एका पानाची भर नाही, एका मिलीमीटरची वाढ नाही. कधीही बघावं. हे आपलं तसंच- तेवढंच- तिथल्या तिथेच. शेवटी सासूबाई म्हणाल्या, ‘कुंडीसकट नेऊन ठेवून दे जिन्यात. झाडूवाली घेऊन जाईल. स्वत:ला ठेवेल, नाहीतर देईल कोणाला हवं असेल त्याला. कुंडीही जुनीच झालीय. नको असेल तर देईल फेकून.’ सकाळी झाडूवाली यायच्या आधीच कढीलिंबाची ती जड कुंडी सरकवत - सरकवत आणली जिन्याच्या दरवाजापर्यंत आणि दार उघडून ठेवली जिन्यात. मग आम्ही दोघीही आपापल्या कामांना लागलो. थोड्या वेळाने ‘आजी आपलं कढीलिंबाचं झाड कुठे गेलं? आई, झाड कुठेय आपलं?’ ऐकून बाहेर गॅलरीत गेलो. तर तुझा रडवेला चेहरा. कधी उठून तू गॅलरीत गेला होतास.

‘काही नाही रे. मरायलाच टेकलं होतं ना ते कधीचं. म्हणून झाडूवाली यायच्याआधीच जिन्यात नेऊन ठेवलंय.’ मी म्हटलं.‘आपण तिथे दुसरं कसलं तरी झाड आणून लावूया.’ आजी म्हणाली. पण तू कसला ऐकतोयस! गेलास सरळ जिन्याचं दार उघडायला. मोठ्ठी कुंडी. तीही मातीने गच्च भरलेली. तुझ्याच्याने हलणार का? शेवटी तू हलवायचा प्रयत्न करतोयस पाहून मीच कढीलिंब परत घरात घेतला आणि त्याला पुन्हा त्याच्या मूळ जागेवर स्थानापन्न केलं. त्याच्या मुळांपाशीची माती गच्च झालेली होती असणार. त्याच्या या प्रवासात हिसके बसल्यामुळे असेल, माती सैल होऊन मुळांनी मोकळा श्वास घेतला असेल. पण कढीलिंब पुन्हा बहरला. फोफावला म्हणणंच अधिक योग्य होईल. तुला तर तो चमत्कारच वाटला असणार त्या वयात. यावेळी त्याच्या पुनर्जन्माची कहाणी आसमंतात दरवळली नाही. त्यामुळे त्याला ओरबाडायलाही कोणी आलं नाही.

खूप वर्षं लोटली त्या घटनेला. मधल्या काळात आपल्या गॅलरीत किती रोपांनी, वेलींनी, झाडांनी वर्णी लावली. त्यांची बालपणं, तरूणपणं, आजारपणं सगळं पाहिलं आपण. पण तुळशीने दाखवलं ते आजारपण मात्र व्यथित करणारंच. अगदी बारीक-सूक्ष्मच म्हणावे अशा किटकांनी आपल्या बहरलेल्या तुळशीला असं घेरलं की, नामोहरमच केलं तिचं

(पान ४ कॉलम ३ वर)

'हर्ष'

# अस्तनीतले निखारे

-हेमंत विनायकराव तळपदे

आज आपण पुन्हा एकदा वेगळ्याच पण अतिशय महत्त्वाच्या विषयावर बोलणार आहोत. प्रत्येक व्यक्ति ही आपलं भलं कसे होईल याचा विचार करत असते. कुटुंबव्यवस्थेवर अधिकांश लोकांचा पूर्ण विश्वास असतो. वयात आल्यावर लग्न करून स्त्री-पुरुष आपला संसार थाटतात. त्यांना त्यावेळी त्यांच्या कुटुंबाचा हातभारही लागतो. आईवडील, नातेवाईक, मित्रपरिवार यांची योग्य अशी साथही मिळते. मग त्यांच्या संसाररुपी वेलीवर एक, दोन अथवा तीन फुलेही उमलतात. त्या फुलांचे संगोपन करताकरता त्या मातापित्यांच्या तारुण्यातले अनेक दिवस, अनेक वर्षे खडतर जातात. आता त्या कळ्यांचे २०-२२ वर्षाच्या युवकयुवतीमध्ये रूपांतर झालेले असते... आणि तेथेच बऱ्याचदा माशी शिंकते.

आताचा काळ हा मुक्त बंधनाचा काळ आहे, असे मानतात. प्रत्येक मुलगा, मुलगी वयात आल्यावर त्यांचे निर्णय स्वत: घेऊ पहातात. यात अयोग्य असे काही नाही. पण हे निर्णय घेताना अनेकदा बरीच गफलत होते. कारण बऱ्याचदा त्यांचे हे निर्णय स्वकेंद्रीत असतात. मी माझे जीवन पुढे कसे जगावे याचा निर्णय ते सहज घेतात त्यावेळी आपले आईवडील, भाऊबहीण काय म्हणतील याचा ते विचारही करत नाहीत. पूर्वीच्या काळी बहुतांश आईवडील मुलगा वा मुलगी वयात आल्यावर त्यासाठी सहचर शोधण्यात स्वत: पुढाकार घेत असत. या तरुणाईला वेळेवर जीवनसाथी मिळवून देऊन सर्व कुटुंबाच्या साक्षीने विवाह वेदीवर वेद-ब्राह्मणांच्या सोपस्कारात विवाहसोहळा संपन्न होत असे. दोन्ही बाजूंकडील परिवार या विवाह सोहळ्यात प्रत्यक्षपणे सामील होत असे. काहीवेळा तर हे विवाहविधी आठवडाभरही चालत. बऱ्याचदा या विवाहाच्या वेळी प्रत्येक बाजू आपली आर्थिक परिस्थिती किती भक्कम आहे या बाबीचा कळत नकळतपणे अविष्कार करत असे.

पण आता परिस्थिती बदलत आहे. जास्त करून आजूबाजूला पाहिले तर १० पैकी सात ते आठ विवाह हे त्या विवाह करणाऱ्या तरुण तरुणींच्या पसंतीचे असतात. त्यातही काही वावगे आहे असे म्हणता येणार नाही. कारण आमचे युवक युवती शैक्षणिकदृष्ट्या पुढारलेले आहेत. तसेच बऱ्याचदा २८-३० वर्षापर्यंत ते चांगले अर्थार्जन करतात. त्यांना स्वत:ची विशिष्ट मते असतात आणि पूर्वीच्या काळापेक्षा ते नोकरी-व्यवसायानिमित्त एकमेकांशी चांगल्या संपर्कात येतात. नंतर संपूर्ण परिस्थितीचे योग्य आकलन करून ते आपला जोडीदार निवडतात. हे देखील बहुदा योग्य आहे असेच म्हणावे लागेल.

मग अस्तनीतले निखारे म्हणजे काय? हा प्रश्न अनुत्तरीत रहातो. माझ्या मते या काळात काही युवक युवती त्यांचा विवाहयोग्य जोडीदार निवडताना एकदम टोकाची भूमिका घेतात. ज्या मातापित्यांनी दिवसरात्र काळजी घेऊन तुम्हाला २७-२८ वर्षे सांभाळलेले असते. चांगले विद्याविभूषित केलेले असते. आर्थिकदृष्ट्या सबल केलेले असते. या मुक्कामापर्यंत तुम्हाला आणण्यात आईवडिलांनी शारीरिक, आर्थिक, मानसिक खस्ताही खाललेल्या असतात. त्या मातापित्यांना, कुटुंबातील सदस्यांना सहजपणे अव्हेरून केवळ आपल्या निवडीप्रमाणे सहचर मिळावा म्हणून हे युवक युवती काहीवेळा त्यांच्या निर्दयी मनाचे दर्शन घडवतात.

बऱ्याचदा अशा प्रकारच्या स्वनिर्णयी विवाहाच्यावेळी या युवक-युवतींचे घरात खटके उडतात. तुम्ही माझ्या लग्नाला परवानगी देत नसाल तर मी स्वत: कोर्टात अथवा देवळात लग्न करेन असे उर्मटपणे सांगून हे युवक युवती त्यांच्या मातापित्यांच्या हृदयावर बरछीचे घाव खोलवर घालतात. यापुढे जाऊन जेव्हा काहीवेळा हे युवक युवती आपल्या कुटुंबाशी कायमचा काडीमोड करतात त्यावेळी त्यांच्या आईवडिलांच्या मनावर होणाऱ्या आघाताची परिसीमा नसते.

मी स्वत: अनुभवलेले एक उदाहरण सांगतो. एकदा भाईंदर स्टेशनच्या पोलीस अधिकाऱ्यांना त्यांच्या मुलासाठी क्लासेस लावायचे होते. ते स्वत: गाडी घेऊन मुलाबरोबर क्लासमध्ये आले. त्यांना मला समक्ष भेटायचे होते. पण मी तेव्हा तातडीच्या कामानिमित्त मुंबईला गेलो होतो. तेव्हा त्यांनी 'सर आले की मला पोलीस स्टेशनला भेटण्यास-सांगा' असे सांगून त्यांचा मोबाईलनंबरही दिला. मी दुसऱ्या दिवशी दुपारी दोन वाजता त्यांना भेटण्यास पोलीसस्टेशनमध्ये गेलो. त्यांनी माझे स्वागत केले व कॉफीही मागवली. तेथे एक ४०-४५ वर्षाची स्त्री रडत बसलेली होती. तिची मुलगी त्यांच्याच इमारतीतील एका मुलाबरोबर पळाली होती. पोलिसांनी दोघांना पकडून नुकतेच पोलीसस्टेशनमध्ये आणले होते व त्या अधिकाऱ्यांनी तिच्या आईवडिलांना बोलावले होते. ती मुलगा, मुलगी १८ वर्षावरील असल्याने पोलीस कायदेशीररित्या त्यांच्यावर कारवाई करू शकत नव्हते. फक्त सामोपचाराने प्रकरण मिटवणे इतकेच

(पान ४ कॉलम ३ वर)

काही नवे - काही जुने

# मी पाठारे प्रभू

-नंदकुमार विजयकर

नवीन गाठी-भेटी, नवीन ओळखी झाल्या की माणसं नाव-गाव विचारतात.

''आपलं नाव?''

''मी विजयकर.''

''विजय... नाव...''

''विजयकर. आडनाव विजयकर.''

आता लोकांची एक सवय असते. खास करून महिलावर्ग. आडनावावरून हा माणूस कोठल्या जातीचा याचे आडाखे बांधायचे. म्हणजे आपटे, आगाशे, गोखले-हे ब्राह्मण. भोसले, पाटील, जाधव हा मराठा. कर्णिक, दिघे, प्रधान म्हटलं की सी.के.पी., हा सारस्वत, हा दैवज्ञ, हा सोमवंशीय असं सारखं त्यांचं चाललेलं असतं.

''विजयकर म्हणजे आपण....''

''आम्ही पाठारे प्रभू.''

''आमच्या समोर एक पाठारे राहतात, ते तुमच्यापैकी...''

''नाही.''

''आमच्या बाजूला प्रभू राहतात ते....''

मला त्यांना सांगावं लागतं, ''हे बघा, आमच्या जातीचं नाव 'पाठारे प्रभू.' पण पाठारे किंवा प्रभू हे आडनाव आमच्यात नसतं.'' मग समोरचा जरा चमत्कारिक नजरेने माझ्याकडे पाहू लागतो. बहुदा त्याच्या मनात ही कोठली जात, असा विचार चालला असावा. असा संभ्रमित चेहरा पाहिला की, मला थोडं नाईलाजानं का होईना त्यांचं बौद्धिक घ्यावं लागतं. ह्या मुंबई नामक बेटावर प्रथम कोळी, आगरी आणि पाठारे प्रभू यांची वस्ती होती. आम्हांला मुंबई सोडून दुसरं गाव नाही. काही प्रसिद्ध व्यक्ती लोकमान्य टिळकांचे शिष्य डॉ. एम.बी. वेलकर, कुलगुरू बाबासाहेब जयकर, भाऊचा धक्का बांधणारे भाऊ अजिंक्य, शिवसेना नेता आमदार प्रमोद नवलकर, सुप्रसिद्ध चित्रपट निर्माते महेश कोठारे वगैरे वगैरे... आपलेच गोडवे गाण्याचा माझा उद्देश नसतो, पण थोडं प्रबोधन करणं आवश्यक आहे असं वाटतं. जेमतेम पाच हजार संख्या असलेल्या या जमातीचा, श्री. प्रताप वेलकर लिखित, 'पाठारे प्रभूंचा इतिहास' हा जाडजूड ग्रंथ त्यांच्यासमोर ठेवला असता तर बहुदा झीटच आली असती.

माझ्या नावाबद्दलदेखील बऱ्याच वेळा गोंधळ होतो. म्हणजे 'विजयकर'चं हमखास 'विजयकुमार' केलं जातं. शाळा, कॉलेज, बँक, पासपोर्ट सगळीकडे हाच अनुभव. कुठलाही फॉर्म भरताना मी विशेष काळजी घेतो. नाव मी कॅपिटल अक्षरात लिहितो. पण गोंधळ व्हायचा तो होतोच आणि दर वेळी तो निस्तरावा लागतो. आपला जन्म कोठल्या जातीत व्हावा, आपलं आडनाव काय असावं हे काही आपल्या हाती नसतं. पण जेथे जन्म होतो त्या जातीचा प्रत्येकाला अभिमान असतो. अस्मिता असते. त्यात वावगं असं काहीच नाही. विचार करत होतो, ह्या आपल्या जन्मगावी आपली ज्ञात एवढी अज्ञात असावी. मग बाहेर तर सगळा आनंदच होता. ह्या बाबतीत मला जो धक्का मिळाला तो डोमिसाईल सर्टिफिकेटच्या वेळी. माझ्या मुलीला मेडिकल प्रवेशासाठी याची आवश्यकता होती. यासाठी प्रथम माझं सर्टिफिकेट घ्यावं लागणार होतं. मी अर्ज भरले. जन्माचे दाखले आणि आवश्यक ती कागदपत्रं जोडून ते सर्व बांद्रा कोर्टात दाखल केले. एका आठवड्यात मला कोर्टात बोलावलं. तिथला अधिकारी म्हणाला, ''तुमचं बर्थ सर्टिफिकेट चालणार नाही.'' ''का?'' त्यात तुमचं नाव नाही. मी पाहिलं, त्यात माझं नाव नव्हतं. 'मग आता?' ''स्कूल लिव्हिंग सर्टिफिकेट आणा.'' तो अधिकारी म्हणाला.

घरी आल्यावर मी माझ्या सर्व फायली धुंडाळल्या; पण स्कूल लिव्हिंग सर्टिफिकेट काही सापडलं नाही. आता ते शाळेतून आणावं लागणार. एस.एस.सी. नंतर प्रथमच मी शाळेत जात होतो. जुन्या इमारतीच्या जागी आता नवीन, प्रशस्त बिल्डिंग उभी होती. शाळा बरीच बदललेली होती. आत प्रवेश केला. कोपऱ्यात एका भिंतीवर 'शीला आय लव्ह यू' असे शिलालेख होते. खरोखरच शाळा खूपच बदललेली होती. ऑफिसमध्ये जाऊन नवीन प्रमाणपत्रासाठी अर्ज केला. सर्टिफिकेट मिळताच कोर्टात दाखल केलं. दोन दिवसांनी परत बोलावणं आलं. ''हे सर्टिफिकेट चालणार नाही.'' ''का? आता काय झालं?'' मी वैतागून बोललो. ''तुमच्या जन्मतारखेचा घोळ आहे. बर्थ सर्टिफिकेटमध्ये २३ जुलै आहे, तर स्कूल लिव्हिंगमध्ये २३ फेब्रुवारी.'' ''आता काय करू?'' ''हे बघा, ॲफिडीवेट करून आणा.'' छे! कोर्टाच्या चकरा घालून मी पार कंटाळलो होतो. शेवटी

(पान ५ कॉलम ५ वर)

# राजास जी महाली

-संजय शरद दळवी

राजास जी महाली, सौख्ये कधी मिळाली

ती सर्व प्राप्त झाली, ह्या झोपडीत माझ्या

ह्या, आणि अश्या, कानाला गोड वाटण्याऱ्या पंक्ती ऐकत आम्ही मोठे झालो.

पहारे आणि तिजोऱ्या, त्यातून होती चोऱ्या,

दारास नाही दोऱ्या, ह्या झोपडीत माझ्या.

अहाहा! अशी प्रतिक्रिया दिली म्हणजे हे सर्वच खरे आहे का, वा हेच सत्य आहे का, असे प्रश्न सहजच मनांत रुंजी घालू लागतात. कोणी सांगितले की, राजाला महालात मिळणाऱ्या मलमली गादीवरील सुखापेक्षा, जमिनीवर झोपल्याने अधिक सुख मिळते? ह्यांच्या दाराला दोऱ्या नाहीत, कारण त्यांच्याकडे कोणी चोरून नेईल असे काहीच नाही. राजाकडे ते आहे, म्हणूनच चोर तिथे चोरी करू पाहतो. गरीबाची मीठभाकर पंचपक्वान्नांपेक्षा रुचकर असते, हे कोणी ठरवले? प्रत्येकजण आपल्या पूर्वाश्रमीचे सुकृत घेऊन जन्माला येतो म्हणतात. म्हणूनच 'तो' राजा झाला आणि आपण असंख्यांपैकी एक आहे त्यात सुख मानून आपण ह्या जन्मी पुण्यसंचय करावा की राजाशी आपली तुलना करून, आपणच श्रेष्ठ आहोत हे सिद्ध करण्याचा फोल प्रयत्न करावा?

मी नेहमीच बघत आलोय, आपल्यापेक्षा वरचढ व्यक्तीला कमी लेखले की खुपश्या माणसांचा अहंकार सुखावतो. अर्थात, नियमाला अपवाद बरेच असतात. पण खरंच विचार करून बघा, जेव्हा कधी असे प्रसंग तुम्ही अनुभवलेले असाल, जसे की नोकरीच्या ठिकाणी काहीजण उगाचच कित्येक वेळेला आपल्या वरीष्ठांबद्दल वा मालकाबद्दल अकलेचे तारे तोडत असतात, तेव्हा आपल्या भिडस्त स्वभावामुळे, वा उगाच का बोला. ह्या उक्तीनुसार आपण काही बोलत नाही, पण तरीही खूपवेळा हे जे काही बोलले जातंय ते बरोबरच आहे अशी भावना आपल्या मनात असते की नाही? अंह! मला उत्तर नकोय, पण तुम्ही आपल्याच मनाला विचारून पहा, मी म्हणतोय यात काही तथ्य आहे की नाही ते. मग का म्हणून आपण ताकाला जाऊन भांडं लपवायचा प्रयत्न करत असतो? का नाही आपण इतरांपासून प्रेरणा घेत, व प्रयत्नांची पराकाष्ठा करत शिडीवर अजून वर चढायचा प्रयत्न करत? 'प्रयत्ने वाळूचे कणही रगडीता तेलही गळे', वा 'प्रयत्नांती परमेश्वर', अश्या म्हणी ऐकल्याच नाही का कोणी? पराक्रमावर लक्ष्मी सदैव प्रसन्न होत असते हे बिंबवून घ्या आपापल्या मनात.

तसे बघायला गेले तर 'जो न देखे रवी, सो देखे कवी'. कवितेच्या माध्यमातून जे काही सांगितले जाते, त्याला एक छानसा मखमली पोत असतो, मग त्यातून विशद झालेली भावना सुखकारी असो किंवा दु:खकारी. कथाकथनातून विख्यात झालेले महान लेखक वसंत पुरुषोत्तम तथा व. पु. काळे ह्यांनी जेव्हा पत्नीच्या निधनानंतर समस्त कवींची क्षमा मागत जी कविता लिहिली, त्यातले पहिलेच कडवे आपल्याला अंतर्बाह्य हलवून जाते. वपु लिहितात, 'औषधांचा उपायांचा वाया गेला अट्टाहास, नाही परतून आला तुझा सुगंधित श्वास'. आता हे वाचून आपला श्वास कोंडला नाही तरच नवल. 'भातुकलीच्या खेळामधली राजा आणिक राणी' लिहिणारे मंगेश पाडगावकर जेव्हा लिहितात 'एक होती बायकू, तिला येत नव्हते आयकू, तिचा होता दादला, तोही एकदा पादला, तरीही आले नाही आयकू, अशी होती बायकू' तेव्हा वाटते कुठे ती भातुकलीच्या खेळामधली तरलता, कुठे हा आयकूबायकूतुनसुद्धा अर्थपूर्णपणे साधलेला ऱ्हिदमकारक तोच, पण पेश करण्यातली वेगवेगळी नजाकत बघाना. हे आयकू प्रसवणाऱ्या कवीचा आयक्यू काय असेल हो, विचारांच्या पलीकडले आहे हे सारे.

मला म्हणायचंय 'राजासजी महाली, सौख्ये कधी मिळाली' ह्या काव्याला माझा विरोध कधीच नव्हता. तो एका कवीच्या प्रतिभेचा कल्पनापूर्ण विलास होता, पण त्यावर अवलंबून आपली मते बनवणे हे मला चुकीचे वाटते. ऐकावे जनाचे, पण करावे मनाचे आणि हे मनाचे ऐकतानासुद्धा तारतम्य भाव सुटू नाही द्यायचा. तरच आपण ह्या भवसागरी तरु, हे पक्के ध्यानात ठेवा.

सांगायचा मुद्दा काय, तर 'वो अफसाना, जिसे अंजामत कलांना न हो मुमकिन, उसे एक खूबसूरत मोड देकर छोडना अच्छा.

(पान ३ कॉलम २ वरून)

बाकी होते. ती आई खूप रडत त्या अधिकाऱ्यांना 'मला एकदा तरी माझ्या मुलीला भेटू द्या'' अशी विनवणी करत होती. त्या पोलीसअधिकाऱ्याने तिला बाहेर थांबण्यास सांगितले. व हवालदाराला बोलावून त्या मुलीला आत बोलावले. ती मुलगी रागातच आत आली. त्या अधिकाऱ्याने तिला 'तुझ्या मातेला तुला भेटायचे आहे, भेटणार का?' असे विचारले. त्यावेळी ती मुलगी भडकली आणि 'मेरी माँ कमिनी है। मै उसका मुँह नहीं देखना चाहती। मैने मेरा पती चुना है अब मुझे माँ बाप से कोई भी रिश्ता नहीं रखना है।' असे उत्तर ताडकन् दिले. मी कॉफी पितापिता स्तंभितच झालो. त्या पोलीस अधिकाऱ्याने तिला बाहेर जाण्यास सांगितले व नंतर आईवडिलांना बोलावून 'आम्ही यापुढे काहीही करू शकत नाही आणि तुम्हीदेखील कायद्याचे पालन करा. कोणतीही टोकाची भूमिका घेऊ नका.' असे सांगून जाण्यास सांगितले. ती बाई रडत रडत बाहेर पडली.

आता प्रश्न असा उरतो की त्या मातापित्यांची संगोपनात काय चूक झाली? मुलीला लग्न तिच्या मर्जीप्रमाणे करायचे होते तर तिने आईवडिलांचा विश्वास का संपादित केला नाही? आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे तिची भाषा. आपल्या मातेला अर्वाच्य भाषेत शिव्या देऊन तिने काय मिळवले? असे अनेक प्रश्न अनुत्तरीत राहतात.

तुम्हीदेखील आजूबाजूला नजर फिरवलीत तर असे अनेक अस्तनीतले निखारे तुम्हाला सहज आढळतील. ते सहजपणे आपल्या कुटुंबियांना तोडतात. बऱ्याचदा घरातून पळून जाऊन लग्नही उरकतात. आईवडिलांना त्यांना समजावण्याची संधीही मिळत नाही. तर कधीकधी तुम्ही माझे लग्न अमुक मुलाबरोबर अथवा मुलीबरोबर केले नाहीत तर मी विष घेईन असेही धमकावतात. याला काय म्हणावे बरे?

तर मंडळी सर्वसाधारणपणे स्वनिर्णय विवाहास आता फार विरोध होत नाही हे खरे. पण यासारखे काही निखारे एकदम टोकाची भूमिका घेऊन आप्तस्वकीयांशी संबंध पूर्णपणे तोडतात हे योग्य आहे असे वाटत नाही.

ज्यावेळी त्या आईवडिलांच्या थकलेल्या खांद्यांना तुमच्या आधाराची गरज असते. कदाचित आर्थिकदृष्ट्या ते सक्षम असतीलही पण मानसिकदृष्ट्या त्यांना तुम्ही जवळ हवे असता. अशावेळी त्यांना पूर्णपणे अव्हेरणे एक नीच कर्मच म्हणावे लागेल.

असे निखारे कधीकधी पुढे काळाच्या तव्याखाली मंदावतात. मग पश्चातापाचा बुरखा घालून त्यांच्या मातापित्यांकडे पुनश्च परततात. पण शेवटी त्या आईवडिलांच्या मनाला झालेली ती काळाची जखम भळभळत रहाते. वरवर त्यांनी मुलाला वा मुलीला माफ केले तरी त्यांचे अंतर्मन आतल्या आत रडतच रहाते हे खरे.

मोबा. ९८२१६०७५९३

*

(पान २ कॉलम ४ वरून)

अस्तित्व. पानन् पान झडलं, मंजिऱ्या सुकून गेल्या, फांदीन् फांदी करपली. किटक इतके लहान, की त्यांनी ग्रासलंय हे कळलंच नाही. सहज सुकलेल्या फांदीवरून हात फिरला, हाताला ओलं काही लागलं, तेव्हा कळलं की तुळशीवर जीव आहेत सूक्ष्मसे. मग मात्र तिच्यावर किटकनाशक फवारलं. अगदी फांदी- फांदी, मंजिरी- मंजिरी, एक तसूभरही जागा सोडली नाही. तीन दिवस केली फवारणी. तुळशीत तर जीव नव्हताच. उगीचच करत होते हे सर्व. कीटक तर मरतील. आजू-बाजूच्या झाडांना तरी त्रास देणार नाहीत, इतकीच अपेक्षा होती. बाजारात गेले, तेव्हा नवं तुळशीचं रोप आणायचं मनातही आलं. पण का कोण जाणे, भाजी-फळं घेऊनच परत आले. सकाळ-संध्याकाळ इतर झाडांना पाणी घालताना तुळशीवर मात्र पाण्याची हलकी-हलकी शिंपण करून भिजवून टाकत होते तिला पूर्णपणे.

सकाळी कुठे चश्मा असतो डोळ्यांना? स्वयंपाक करताना त्याच्या काचांवर वाफ आली की पूर्ण आंधळंच व्हायला होतं ना! पण आदल्या आठवड्यात कुंड्यांच्या पाठून पाल सरसरत गेली होती, तेव्हापासून गॅलरीत जाताना चश्मा लावून जात होते. तर त्या दिवशी डाळ-तांदूळ धुतलेलं पाणी घालायला गेले झाडांना, तर वठलेल्या तुळशीच्या जाड्या-बारीक फांद्यांमधे सूक्ष्म हिरवे ठिपके. चश्मा होता म्हणूनच दिसले. नाही! हिरवे किटक नव्हते ते. किटकांपेक्षाही सूक्ष्म असे अंकुर अंगभर फुटले होते आपल्या तुळशीला. मीच अंगभर दागिन्यांनी सजल्यासारखं वाटलं मला क्षणभर. गेले चार दिवस पाहातेय; ते हिरवे ठिपके थोडे-थोडे मोठे होत चाललेत. एक-दोन ठिकाणी त्यांना पानांसारखा आकारही यायला लागलाय. म्हणून तुला आत्ता हाक मारली. तुझं 'वर्क फ्रॉम होम' चालू होतं. पण 'तुळस सुकलीय' ऐकल्यापासून व्यथित झालेला तूही पटकन उठून आलास ती नव्याने अंकुरणारी तुळस बघायला. माझ्या डोळ्यांमधे गेले चार दिवस आलेला हळवा भाव तुझ्या डोळ्यांतही दाटला. झाडांच्या बाबतीत घडतं, ते माणसांच्या बाबतीत का नाही घडत रे? आता पाल पळालीय. गॅलरीत जाताना चश्मा लावावा लागत नाही. पण तुळशीकडे पाहाताना नजर धूसर होते. चश्म्याच्या काचेवर वाफ आल्याने होते तशी. का असेल रे?

मो.८७७९१९४०४२

*

# ‘राणेवाडीची तत्कालीन संरचना’

**-सतीशचंद्र मंगेश धुंडीराज कोठारे**

**भाग १**

राणेवाडी - अंधेरी येथील पाठारे प्रभूंचे वास्तव्य असलेली त्या काळची एक दिमाखदार जागा.

बहुतेक सगळ्या पाठारे प्रभूंचा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे संबंध असलेली राणेवाडी व तेथे वास्तव्यास असणाऱ्यांच्या आठवणी वाचकांच्या मनांत पुन:जागृत करण्यासाठी सदर खटाटोप.

माझा जन्म गिरगावातील झावबावाडीच्या नाक्यावरील वगळ इस्पितळातील.

गिरगावात काही काळ काढल्यावर, यथावकाश आई व आम्हा तिघा भावंडांना घेऊन बाबा अंधेरी पश्चिमेस स्थित स्वत:च्या घरी आले.

**अंधेरी -**

१९६७ साली अंधेरी हे एक गाव होते. मला आठवते त्यानुसार पूर्ण अंधेरीमध्ये तेव्हा एक टांगा होता व बेस्टच्या निवडक बस धावत होत्या, बहूतेक २५२ व २५१ क्रमांकाच्या. दुसरी सार्वजनिक दळणवळणाची साधने अशी नव्हतीच.

स्टेशनपासून आमचे घर चालत साधारण १० मिनिटांवर होते. कधी कधी शॉर्टकट म्हणून गावठाणच्या गल्ल्यांमधून पुढे शांतावाडीमधून बाहेर पडून थोडं लवकर घरी जाता येत होते. चढ असल्यामुळे सर्वजण तो रस्ता टाळत असत. त्याकाळी गावठाण तसं शांत व कमी वर्दळ असलेले ठिकाण होते तर ठराविक वेळेनंतर तेथून जाणंयेणं लोक शक्यतो टाळायचे.

**राणेवाडी -**

दादाजी धाकजी राणे नावाच्या कर्तबगार पाठारे प्रभुने आपली जागा पा. प्र. समाजातील लोकांच्या राहण्याची सोय करण्याकरिता दान केली, म्हणून तिचे नाव ‘राणेवाडी’!

श्रीमंत माणसाची सुट्टीतील विरंगुळ्याची जागा, ज्याला आता फार्महाऊस म्हणतात तशीच ही जागा म्हणजे राणेवाडी.

साधारण चार ते पाच एकरांमध्ये पसरलेली ही राणेवाडी.

काळ्या दगडांचे कुंपण व भव्य लोखंडी दरवाजा असलेली राणेवाडी.

दरवाज्यातून आत शिरताच उजव्या बाजूला राणेंचा भव्य एकमजली बंगला नजरेस पडतो. बंगल्याजवळ एक पाण्याचे कारंजे होते. दारातच खूप उंच बकुळीच्या फुलांचे झाड होते. लहानपणी त्या फुलांना आम्ही ओवळीची फुलं म्हणायचो.

मला आठवते आहे तेव्हापासून त्या बंगल्यात अनेक ख्रिस्ती कुटुंबं रहात होती. त्यांच्याबद्दल पुढे बोलू.

तर दरवाज्यातून आत शिरल्यावर उजव्या बाजूला ऐसपैस बंगला तर डाव्या बाजूला कोकणातील घरांची आठवण करून देणारे एक कौलारू टुमदार बैठे घर होते. तिथे सावंत, मेस्त्री व दळवी नावांची कुटुंबे रहात होती. त्यांच्याबद्दल पुढे माहिती करून घेऊ.

तर डाव्या बाजूलाच सावंतांच्या घराच्या बाजूला एक बंदिस्त विहीर होती. त्याचा घेर खूप मोठा होता परंतु त्या विहिरीचे तोंड सिमेंट कॉंक्रीटच्या स्लॅबने बंद केले होते. त्याचे कारण मला तरी कधीच समजले नाही. परंतु त्या बंद विहिरीवर आम्ही लहानपणी खूप खेळायचो. कधीतरी त्या विहिरीवरील छोटं झाकण कोणाचं लक्ष नाही बघून गुपचूप उघडायचो तर खूप खोल पाणी दिसायचे. नंतर नंतर मोठी माणसे सांगायचं की पूर्वी ही विहीर चांगली होती परंतु नंतर कधीतरी शेजारील दादाजी धाकजी स्मारक इमारतीतील सांडपाणी व मैला वाहून नेणारे पाईप फुटून विहिरीचे पाणी दूषित झाले. खरे-खोटे काय हे त्या देवालाच माहीत, असो.

तर सदर विहिरीला खेटून, अगदी खेटूनच एक इमारत होती. मुकुंदराव दादाजी स्मारक भुवन. तळ मजला अधिक तीन मजले अशी प्रत्येक मजल्यावर तीन बिऱ्हाडे असलेली ही इमारत. १९६७ मध्ये बांधलेली व त्यातल्या त्यात वाडीतील नवीन बांधकाम म्हणून ‘नवी बिल्डिंग“ असे अनौपचारिक नामकरण झालेली. त्याच्या गच्चीची रचना व तिथे जाण्याचा जिना हा एक संशोधनाचा विषय आहे. त्यातील बिऱ्हाडांबद्दल नंतर सविस्तर बघूया.

त्या इमारतीच्या मागे आहे एक चाळवजा इमारत. चाळवजा इमारत अशा कारणाने की त्याची रचना ही चाळीसारखी होती. सरळ रेषेत सामाईक ओसरी, आतल्या बाजूला उघडणारे सदनिकेचे प्रवेशद्वार. मग स्वयंपाकघर, एक छोटी मोरी, नंतर एक दिवाणखाना कम शयनकक्ष कम बरेच काही असणारी एक खोली व सार्वजनिक संडास व मोऱ्या. परंतु इमारत ही सिमेंट कॅांक्रिटची, तळ मजला व पहिला मजला असलेली. दोन्ही बाजूला खाली चार व वरती चार खोल्या व मधून जीना असलेली इमारत. त्यातील लोकांबद्दल एक वेगळा लेख मला लिहायला आवडेल कारण त्या चाळीतील तळमजल्यावरील शेवटच्या खोलीत मी रहायचो.

खरे तर त्या इमारतीचा पहिला भाग म्हणजे पहिल्या आठ सदनिका ह्या प्रथम बांधल्या. म्हणजे १९६० साली व त्या इमारतीचे नाव ठेवले मुकुंद आश्रम. नंतरच्या आठ खोल्या दोन वर्षांनंतर म्हणजे १९६२ साली डायमंड ज्युबेली इमारत ह्या नावाने बनवल्या. माझे वास्तव्य हे डायमंड ज्युबेली इमारतीत होते.

वाडीत आत शिरल्यावर उजव्या बाजुला बंगला व पुढे गेल्यावर उजव्या बाजूलाच अजून एक मोठी विहीर होती व तिला लागून एक बॅरकसदृश बैठी चाळ होती. त्यामध्ये एकंदर सहा खोल्या होत्या व त्या चाळीच्या मागच्या बाजूस अजुन एक बैठी चाळ होती जिथे दोन खोल्या होत्या परंतु तिथे कोणीही रहात नव्हते. परंतु त्याच्या मागे एक मजकुंदाचे झाड होते व त्याची पिवळीजर्द फुले व त्यांचा काहीसा उग्र व गुढ वास अजूनही आठवतो. आम्हा मुलांसाठी तो कोपरा जरा भीतीदायकच होता. भर दुपारी वा सांजवेळी तिथे जाताना आमची घाबरीफाईड व्हायची. तेथेच ब्लॅकबेरीचे, होय बरोबर वाचलेत, चक्क ब्लॅकबेरीचे झाड होते. परंतु तेव्हा आम्हाला ब्लॅकबेरी काय तेच माहीत नव्हते व त्याचे काही अप्रूप पण नव्हते. विलायती चिंचा वा बोरे, तसेच हे फळ, एवढेच माहीत होते. चव मस्त आंबट गोड व प्रथम हिरवी मग लाल व पिकल्यावर काळी असायची ही फळे.

विविध झाडांनी समृद्ध होती राणेवाडी. वाडीत शिरल्याबरोबर उजव्या बाजूला बकुळीचे झाड, अंबाडीचे झाड होते. डाव्याबाजूला बैठ्या घराजवळ आंब्याचे उंच झाड मग चिकूचे झाड, त्याच्या बाजूला शेवग्याच्या शेंगांचे (शेकट्याच्या शेंगा) झाड. जवळच बदामाचे झाड, केळीचे बन. वाडीच्या मध्यभागी चिकू, नारळ, बदाम व जांभळाचे झाड जवळच होते. पुढे बंगल्याला लागून होती बोराची जाळी. विहिरीजवळ पिवळा चाफा होता व बॅराकसदृश्य चाळीच्या शेजारी एक अवाढव्य बहुधा गुलमोहराचे झाड होते. त्याच्या फांद्यांची छत्री व बुंध्याचा घेर खूप मोठा होता. ऊन्हाळ्यात त्याच्या सावलीत भरपूर गोट्या खेळायचो आम्ही मुले.

आमच्या चाळींच्या परसदारी, तळमजल्यावरील प्रत्येकाच्या दारांसमोर मोकळ्या जागेत पेरू, डाळिंब, अनंत, पपया, सोनटक्क्याचा वाफा, आंबा व तगर अशी असंख्य झाडे होती.

वाडीच्या एका बाजूला मुख्य रस्ता- जयप्रकाश रोड, डावीकडे आरबीआयची कॅालनी, पुढे एक वाडी मग उजव्या बाजूला ग्रिनलेज बॅंकेची कॉलनी व पुढे टेप विलेज म्हणून मोठी झोपडपट्टी, अशी चतु:सीमा असलेली आमची राणेवाडी.

ह्याच वाडीतील बिऱ्हाडे, त्यांच्या गमतीजमती, आम्हा मुलांचे खेळ, मग भांडणे, सार्वजनिक उत्सव, पूजा वगैरे आठवणींना ऊजाळा देणारे लेख सादर करावे तसेच रम्य आठवणींना ऊजाळा देण्याचा एक प्रयत्न करावा ही इच्छा धरून माझे लेखमालेतील प्रथम पुष्प वाचकांना अर्पण करतो.

---

(पान २ कॉलम ४ वरून)

थोडीशी ओळख काढून कागद वर सरकवायची तजवीज केली.

एके दिवशी बांद्रा कोर्टातून पत्र आलं. मी ताबडतोब तिकडे गेलो. आज काय वाढून ठेवलंय कोण जाणे. मी मॅजिस्ट्रेट साहेबांच्या खोलीत गेलो. तिथला अधिकारी साहेबांना सांगत होता, ‘‘साहेब, यांच्या अर्जाला हरकत आहे.’’ ‘‘काय प्रॉब्लेम आहे?’’ साहेबांनी विचारलं. ‘‘जन्मतारीख बरोबर नाही.’’ साहेबांनी अर्ज पाहिला. ‘‘कोण विजयकर ना? अहो हे पाठारे प्रभू, मुंबईचे मूळचे रहिवासी, खानदानी लोक. त्यांना कसलं ऑब्जेक्शन घेता? देऊन टाका त्यांना सर्टिफिकेट.’’ मी तर तीन ताड आकाशातच उडालो. इतक्यात त्यांचा तो दुर्मुखलेला शिपाई कडमडला. ‘‘साहेब, यांना पुढच्या आठवड्यात यायला सांगा. टायपिस्ट रजेवर आहे.’’ मी धाडकन जमिनीवरच आपटलो. साहेबांनी माझ्याकडे पाहिलं आणि म्हणाले, ‘‘मि. विजयकर तुम्हांला टायपिंग येतं?’’ मी हो म्हणालो. मग शिपायाकडे वळून ‘‘हे बघ, यांना फॉर्मस् दे आणि त्यांचं टाईप करून झालं की माझ्याकडे घेऊन ये. आणि हो, बाहेर थांबले आहेत त्यांना पुढच्या आठवड्यात बोलाव.’’

चला. आमची वरात त्या शिपायामागून निघाली. तीन-चार दालनं ओलांडून त्याने मला एका ठिकाणी आणलं. फॉर्मस् दिले. टाईपरायटर दाखवला. आणि झटकन निघून गेला. मला कॉपीसाठी कार्बनपेपर पाहिजे होता. त्या डिपार्टमेंटलमधले लोक माझ्याकडे मख्खपणे पाहत होते. शेवटी मीच कोठूनतरी कार्बनपेपर मिळवला आणि टायपिंगला सुरुवात केली. मी थोडी सुरुवात करतो ना करतो, तोच दोन-चार माणसं माझ्याभोवती गोळा झाली. ‘‘साब, हमारा भी करके दोना, मेहरबानी होगी.’ मला हसावं का रडावं तेच कळेना. माझंच झालं थोडं. टायपिंग संपवलं. साहेबांच्याकडे गेलो. सही-शिक्क्यावर सर्टिफिकेटस् हाती पडली.

मी बाहेर आलो. महिनाभर चकरा मारून कंटाळलो होतो. पण आज अचानक माझं काम झालं होतं. कोर्टाच्या पायऱ्यांवरून ओरडून सांगावसं वाटत होतं, ‘‘मी मुंबईचा रहिवासी. Yes, I am a pathare, prabhu.

(‘सल-शिरा’ कथासंग्रहातून)

## प्रभु तरुण आश्रयदाते

१) सौ. विमल व श्री. माधव नायक,
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर,
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर
कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानूजी दळवी
१०) कै. सौ. शलाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि
कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तिकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिंक्य
१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) ॲड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर,
कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे,
कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर,
कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे
यांच्या स्मरणार्थ एक हितचिंतक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व
कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक
३२) कै. सौ. विजया व श्री. प्रकाश माधव नायक या त्यांच्या आईवडिलांच्या स्मृत्यर्थ उन्मेष प्रकाश नायक
३३) सौ. वृंदा आणि श्री. शाम विनायक जयकर
३४) कै. श्रीमती जयश्री आणि कै. श्री. जयवंत विश्वनाथ कीर्तिकर स्मृत्यर्थ श्री. उमेशचंद्र जयवंत कीर्तिकर
३५) कै. श्रीमती प्रतिमा आणि कै. श्री. धाकलेश्वर बाळाजी जयकर स्मृत्यर्थ सौ. सुप्रिया उमेश कीर्तिकर

## प्रभुतरुणाची डायरी

### कुर्यात् बटोर्मंगलम्।

७-४-२३ क्रिश मंजुष मिलींद कोठारे, माहिम

### नारळसाखर दिला

गुढीपाडवा - कु. वरदा प्रशांत वेलकर श्री. तन्मय संदीप लालसेन कोठारे

### विवाह माणिक महोत्सव

९-१२-२२ श्री. मिलींद मुकुंद वाझकर कु. लीना पांडुरंग धैर्यवान
१७-३-२३ श्री. दिलीप नारायण विजयकर कु. संध्या मोरेश्वर तळपदे
०१-५-२३ श्री. प्रशांत मोहनलाल राणे कु. निकेता शाम जयकर

### मरण

| | | | |
|---|---|---|---|
| ३१-३-२१ | डॉ. मधुबाला बाळाजी राव, | वय ९१, | खार |
| १२-४-२३ | श्रीम. पद्मा विजय कोठारे, | वय ९२, | ह्यूस्टन, यूएसए- |

## पाठारे प्रभु महिला समाज

पाठारे प्रभू महिला समाजाचा सालाबादप्रमाणे चैत्रगौरी हळदीकुंकू समारंभ दिनांक ७ एप्रिल २०२३ रोजी सी. के. पी. हॉल खार येथे मोठ्या थाटात पार पडला. नेहमीप्रमाणे देवीची आरास फुलांची सजावट करून सुशोभित करण्यात आली होती त्यावेळी खालील स्पर्धा घेण्यात आल्या.

फॅन्सी ड्रेस स्पर्धा: मुलींसाठी १५ वर्षाखाली. समाजाचे बक्षीस किमया अपूर्व कोठारे हिला देण्यात आले. फॅन्सी ड्रेस महिलांसाठी: समाजाचे बक्षिस स्वप्ना विनीत जयकर ह्यांना देण्यात आले.

वक्तृत्व स्पर्धा मुलींसाठी: विषय-फास्टफूड (इंग्लिश): स्पर्धकाअभावी स्पर्धा झाली नाही. वक्तृत्व स्पर्धा महिलांसाठी: आयत्यावेळी दिलेल्या विषयावर वक्तृत्व करणे. प्रथम क्रमांक गीता धराधर आंबवणे विषय: सोशल मीडिया. द्वितीय क्रमांक: स्वप्ना विनीत जयकर विषय-कुटुंबप्रमुख म्हणून स्त्रियांचे योगदान. तृतीय क्रमांक: डॉक्टर ज्ञानेश्वरी अनिल तळपदे विषय-अनावश्यक खरेदी. उत्तेजनार्थ: वर्षा कैलास कीर्तिकर विषय-थांबला तो संपला.

वक्तृत्व स्पर्धा हिंदी: विषय-आयत्या वेळेला दिलेल्या विषयावर वक्तृत्व करणे. प्रथम क्रमांक: गीता धराधर आंबवणे, विषय-समयका सदुपयोग. द्वितीयक्रमांक: स्वप्ना विनीत जयकर विषय-महंगाई एक समस्या. कलात्मक पाककृती स्पर्धा व पाकसिद्धी स्पर्धा विषय- विविधरंगी तळलेल्या करंज्या (कानवले) घरून करून आणणे. समाजाचे बक्षिस: श्रुता आनंद तळपदे यांना दिले.

पाकसिद्धी स्पर्धा मुलींसाठी: विषय-चायनीज भेळ. समाजाचे बक्षीस किमया अपूर्व कोठारे हिला देण्यात आले.

चित्रकला स्पर्धा महिलांसाठी: विषय-विविध फुलांच्या गुच्छासह फुलदाणी काढून रंगवणे. प्रथम क्रमांक: प्रणोती मिलिंद कीर्तीकर, द्वितीय क्रमांक: ज्ञानेश्वरी अनिल तळपदे, तृतीय क्रमांक: सपना विनीत जयकर. चित्रकला स्पर्धा मुलींसाठी अ गट पाच ते आठ वर्ष. विषय: आयत्यावेळी दिलेले चित्र क्रेयॉनने रंगवणे. अनंदिता विद्याधर आगासकर हिला समाजाचे बक्षिस दिले. ब गट ९ ते १५ वर्ष मुलींसाठी विषय-सूर्यास्त. प्रथम क्रमांक: चिन्मयी अनिल तळपदे, द्वितीय क्रमांक: साक्षी अनिल तळपदे आणि तृतीय क्रमांक किमया अपूर्व कोठारे.

संगीतस्पर्धा मुलींसाठी: विषय-भक्तिगीत स्पर्धकाअभावी स्पर्धा झाली नाही. संगीतस्पर्धा महिलांसाठी: विषय-भक्तिगीत (पाठांतर आवश्यक. ट्रॅकवर गाणे) प्रथम क्रमांक: सुहास नंदकुमार विजयकर, द्वितीय क्रमांक नीलम अपूर्व कोठारे, तृतीय क्रमांक रजनी नितीन कोठारे आणि उत्तेजनार्थ क्षमा पद्मकुमार कोठारे.

नृत्यस्पर्धा सभासदांच्या मुलामुलींसाठी होत्या. विषय-हिंदी सिनेसंगीत अ गट पाच ते नऊ वर्षे मुलेमुली क गट १६ ते २५ आणि ड गट २६ ते ४० मध्ये. स्पर्धकाअभावी स्पर्धा झाली नाही. ब गट पंधरा वर्षावरील मुलेमुली यामध्ये किमया अपूर्व कोठारे हिला समाजाचे बक्षीस देण्यात आले. इ गट चाळीस वर्षावरील महिला प्रथम क्रमांक सपना विनीत जयकर, द्वितीय क्रमांक गीता धराधर आंबवणे. उत्कृष्ट नृत्यदिग्दर्शक पारितोषिक सपना विनीत जयकर, आशा मिलिंद जयकर पुरस्कृत उत्कृष्ट नृत्याविष्कार सपना विजयकर.

स्पर्धा संपल्यावर हजर असलेल्या महिलांना बत्तासे, थंडगार पन्हे व गजरे देऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

✳

## अभिनंदन

✶ चौदा एप्रिल दोन हजार तेवीस रोजी बाबासाहेब आंबेडकर जयंतीदिनाचे औचित्य साधून डिंपल पब्लिकेशन आणि आयडियल बुक डेपो यांनी सहकार्याने आयोजित केलेल्या पुस्तकप्रकाशन सोहळ्यात आमचे सदर लेखक श्री नंदकुमार विजयकर यांच्या 'मासलेवाईक माणसे' या पुस्तकाचे प्रकाशन डॉ. नंदा मेश्राम यांच्या हस्ते झाले. आपल्या भाषणात डॉ. नंदा यांनी या पुस्तकाची वैशिष्ट्ये सांगून शुभेच्छा दिल्या.

✶ 'वर्ल्ड हेरिटेज डे' साजरा करताना 'मिड डे' या दैनिकाने शहराची पुरातन संस्कृती जपणाऱ्या सॉलि. श्री. राजन जयकर यांची फोटोसह मुलाखत प्रसिद्ध केली.

✶ ॲडव्होकेट श्रीम. लता सुधीर भगवान देसाई यांना मुंबई हायकोर्टाने १७/३/२३ रोजी सिनियर ॲडव्होकेट कौऊसिल म्हणून सन्मानित केले आहे. लोकसेवेसाठी आपल्या व्यवसायात सदैव तत्पर असणाऱ्या श्रीमती लता या पदाच्या मानकरी ठरणाऱ्या पहिल्या पाठारे प्रभू आहेत.

✶ ९ ते १२ एप्रिल २०२३ रोजी आकाशवाणीवर डॉ. सुमन नवलकरांचे 'चिंतन' सादर झाले. त्यात त्यांनी विविध विषयांवर चिंतन केले. निवृत्तीनंतरचा रिकामा वेळ एखादा छंद जोपासून सत्कारणी लावावा, कुठल्याही आततायी लकबींना अनुसरून तरुण पिढीने जीव धोक्यात घालू नये इ. चिंतनात्मक संवाद त्यांनी साधला. आजच्या मराठीवरही त्यांनी भाष्य केले. आज आपण बोली मराठीला दुसऱ्या भाषेत गुंतवून विपरीत अर्थाची मराठी बोलतो हे सांगतांना त्यांनी फार उचित उदाहरणे श्रोत्यांना सांगितली. जसे की, 'आपण बेल वाजवतो' म्हणण्याऐवजी आजकाल 'बेल मारतो' म्हटले जाते. कुणी व्यक्ती गेली की तिचा उल्लेख 'स्वर्गीय' असा करतो; पण तेथे 'स्वर्गवासी' म्हटले गेले पाहिजे. चिंतन संवादातून श्रोत्यांना असे विचार ऐकायला मिळाले.

✶ नम्रता विजयकर यांची प्रथितयश व्यवसाय निर्माती म्हणून मुलाखत गुगलवर प्रसिद्ध झाली.

✶ श्री. निमिष महेश जयकर यांना रुतगरतर्फे यावर्षीचे कॉम्प्युटर सायन्स ॲकॅडमिक अचिव्हमेंट अवॉर्ड देऊन गौरविण्यात आले. विद्यापीठातील 'सुम्मा कम लुडे' हे सर्वोच्च स्तरावरील त्यांचे सुयश या अवॉर्डसाठी कारणीभूत ठरले.

✶ डॉ. अंबरीश प्रफुल्ल विजयकर या जगप्रसिद्ध होमियोपाथ असलेल्या ज्ञातीयाला यशवंतराव चव्हाण सेंटरमध्ये महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री माननीय देवेन्द्र फडणवीस यांच्या हस्ते 'लोकशाही सन्मान' देऊन गौरविण्यात आले. डॉ. अंबरीश यांनी पुरस्काराचे श्रेय त्यांचे वडील आणि गुरू असलेल्या डॉ. प्रफुल्ल विजयकर यांना दिले आहे.

✶ दिनांक ५ मे रोजी खार येथील पाठारे प्रभू सांस्कृतिक सभागृहात सौ. निकेता प्रशांत राणे यांच्या 'स्फूर्ति' या कवितासंग्रहाचे प्रा. सुहासिनी कीर्तिकर यांच्या हस्ते प्रकाशन झाले. या संग्रहाला प्रस्तावनाही त्यांचीच आहे. समग्र वृत्तान्त पुढील अंकी.

✶ दिनांक १ मे या महाराष्ट्र दिनी मुलुंड कॉलेजच्या माजी सहकाऱ्यांनी लिहीलेले 'स्मृतिगंध' हे पुस्तक प्रकाशित झाले. या पुस्तकाच्या संपादकद्वयापैकी एक आहेत प्रा. सुहासिनी कीर्तिकर. प्रकाशन समारंभास 'पा. टि. वि.अ.'चे विश्वस्त श्री. बन्सीधर धुरंधर उपस्थित होते.

✶ 'व्यास क्रिएशन' या प्रकाशनाने काढलेली डॉ. सुमन नवलकरांची बाल कादंबरी पुस्तकमहोत्सवात ठाणे येथे प्रकाशित झाली. त्याचे प्रकाशन प्रा. सुहासिनी कीर्तिकर यांच्या हस्ते झाले.

सर्वांचे मन:पूर्वक अभिनंदन.

हे मासिक मुद्रक, प्रकाशक श्रीमती सुहासिनी कीर्तिकर यांनी मालक बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुण करिता मे. स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ, शाह अँड नाहर इंडस्ट्रीयल इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-४०००१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४००१०२ येथे प्रकाशित केले.

**संपादक: श्रीमती सुहासिनी कीर्तिकर** RNI NO. 14613/67